प्रेस नोट, दिनांक :- २१/०९/२०१७

## कोथरूड पो.स्टे. परिसरात दहशत पसरविणा-या अट्टल गुन्हेगारावर एम.पी.डी.ए. कायदयान्वये स्थानबध्दतेची कारवाई

कोथरूड पो. स्टे. हद्दीत राहणारा गुन्हेगार इसम नामे सुरज अशोक ढोकले, वय-२२ वर्षे, रा. सर्व्हे नं.१११, दत्तनगर, सुतारदरा, कोथरूड, पुणे हा अभिलेखावरील सराईत गुन्हे करणारा गुन्हेगार आहे. त्याने त्याचे साथीदारांसह कोथरूड पोलीस ठाणे परिसरात चाकू, कुकरी, कोयता, तलवार यासारखी जीवघेणी हत्यारे बाळगुन दरोडा, जबरी चोरी, दुखापत, दंगा, घातक शस्त्रे जवळ बाळगणे सारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. त्याची गुन्हेगारी कृत्ये सन-२०१३ पासून चालू आहेत. त्याचेविरूध्द सीआर.पी.सी. ११० व १०७ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात येवून सुध्दा त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर काहीएक परिणाम होत नसलेचे दिसून आले होते. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परीसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जिवीताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

श्री. रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.फुगे, कोथरूड पो.स्टे. यांनी एमपीडीए कायदयान्वये नमुद इसमास स्थानबध्द करण्याकामी प्रस्ताव तयार करुन मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचेकडे सादर केला होता. श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी प्रस्तावाची पडताळणी करुन नमुद इसमाचे विरुध्द दिनांक २१/०९/२०१७ रोजी एमपीडीए कायदयान्वये एक वर्षाकरीता स्थानबध्दचे आदेश पारीत केले आहेत. त्यानुसार त्यास कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा, कोल्हापूर येथे स्थानबंध्द करुन ठेवण्यात येत आहे.

गेले नऊ महिन्यात अशा गुन्हेगारी वृत्तीच्या १५ इसमांना एमपीडीए कायदयान्वये स्थानबध्द केले आहे.